(1)

आ-1.

दिनांक : 18 जानेवारी, 1995.

विषय : दिनांक 10.1.95 ( मंगळवार ) रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 65वी सभा मंगळवार दिनांक 10.1.95 रोजी मा. मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे कार्यइतिवृत्त सोबत मंजूरीस्तव सादर करीत आहे.

मुख्य प्रशासकीय अधिकारी.

सदस्य सचिव.

मा. मंत्री, न.वि. व
मंडळाचे अध्यक्ष.

Arvind Govardhan
28/1/95

त्वरित मंडळ सदस्यांना पाठवावे.

विषय :-दि.10.1.95 (मंगळवार) रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त....

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 65 वी सभा मंगळवार दि.10.1.95 रोजी मा.मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष यांचे दालनात सकाळी 11 वाजता घेण्यात आली. अध्यक्षस्थानी मा.श्री.अरूण गुजराथी, मंत्री, नगर विकास व मंडळाचे अध्यक्ष होते. सभेस मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.श्री.अरूण गुजराथी,
अध्यक्ष,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
मा.मंत्री, नगर विकास,
मंत्रालय,मुंबई-32.

2. श्री.य.ल.राजवाडे,
प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-32

3. श्री.डी.टी.जोसेफ,
सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-32.

4. श्री.सुरेश कुमार,
सचिव,ग्राम विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-32.

5. श्री.श्री.ब.गांगुर्डे,
उप सचिव,खर्च, वित्त विभाग,
मंत्रालय,मुंबई-32.

6. श्री.जगन्नाथ शिवलींग पाटील,
सदस्य,
जिल्हा परिषद,सोलापूर,
जि.सोलापूर.

7. श्री.गणेश रॉय,
सदस्य,
अध्यक्ष,चांदूर रेल्वे नगरपरिषद,जि.अमरावती.

8. श्री.एम.आर.अगरवाल,
सदस्य,
ए-1/5, अगरसेन सोसायटी,
कोरेगांव पार्क, पुणे.

9. श्री.एम.के.गोखले,
सदस्य,
नृसिंह धाम, विष्णूनगर,
नौपाडा,ठाणे.

10. श्री.राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव,
म.पा.पु.व ज.नि.मंडळ,
मुंबई-21.

मंडळाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाचे खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. श्री.एस.डी.अरमाळ, मुख्य अभियंता (प्रकल्प)
2. श्री.डी.के.भसाळे, मुख्य अभियंता (नागरी)
3. श्री.एस.व्ही.शेळकीकर, मुख्य अभियंता (ग्रामीण)
4. श्री.एस.के.पाटील, मुख्य अभियंता (जागतिक बँक)
5. श्री.ज.बा.आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
6. श्री.एम.आर.कुलकर्णी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी.

मंडळाचे अध्यक्ष व मंत्री, नगर विकास यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मंडळाच्या सदस्य सचिवांनी तीन नवीन नियुक्त मुख्य अभियंता, सर्वश्री डी.के.भसाळे, एस.व्ही.शेळकीकर व एस.के.पाटील यांचा सर्वांना परिचय करून दिला व नंतर मंडळाच्या कामकाजास सुरवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.1** : महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 64 व्या सभेच्या प्रारूप इतिवृत्तास मान्यता देणे.

मंडळाच्या दि.20.10.94 रोजी झालेल्या 64 व्या सभेचे इतिवृत्त मंडळाचे सभासदांना पत्र क्र.मपापुजनिमं/1094/सभा-64/आ.4 दि.6.12.94 व्दारे पाठविण्यात आले, त्यास कोणत्याही सदस्यांनी सूचना अगर दुरूस्ती सुचविली नाही असे सदस्य सचिवांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणले. त्यानंतर अध्यक्षांनी इतिवृत्तात काही बदल हवेत काय अशी सदस्यांना विचारणा केल्यानंतर सदस्यांनी कोणताही आक्षेप घेतला नाही, व इतिवृत्तास दुजोरा देण्यात आला व 64व्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.2** :-महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 64 व्या सभेतील बाबींवर करण्यात आलेली कृती.

सदस्य सचिवांनी मंडळाच्या 64 व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवरील केलेली कृती वाचून दाखविली. त्यावर चर्चा करताना खालील सूचना करण्यांत आल्या.

**कार्यवाही:**
**मुख्य अभियंता (ना)**

**बाब क्र.2** :- श्री.गोखले, सदस्य यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, बोअरवेलवर सुध्दा ब-याच मोठया प्रमाणात पाणी पुरवठा योजना आहेत, त्यामुळे बोअरवेलवर पाणीपुरवठा योजना अजिबात घेऊ नयेत असे म्हणणे उचित होणार नाही. त्यांचेसाठी काहीतरी निकष ठरविण्यात यावे आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये हे करणे शक्य व्हावे अशा प्रकारच्या सूचना देण्यात याव्या आणि या सूचना नागरी योजनांना सुध्दा लागू करण्यात याव्या.

**बाब क्र.3** :- आस्थापना, हत्यारे व सनियंत्रण आकार वाढविणे बाबत...

आस्थापना, हत्यारे व सनियंत्रण,आकार वाढविणे बाबतच्या समितीमध्ये श्री.गणेश रॉय यांचे नांव अंतर्भूत करावे असे ठरले. या संदर्भात सचिव, ग्राम विकास यांनी असाही मुद्दा उपस्थित केला की, सद्याच्या महागाईमुळे विभाग/उप विभाग या जुन्या पध्दतीमुळे काम अतिशय खर्चिक झाले आहे, तेंव्हा जास्तीत जास्त कॉम्पुटरायझेशन करून कर्मचारीवर्ग कमी करण्याचा प्रयत्न करण्यात यावा व त्यादृष्टीने मंडळातील कर्मचारीवृंदाचा आवश्यक तेथे आढावा घेण्यात यावा.

कार्यवाही:
मुख्य अभियंता (ग्रा)

**बाब क्र.4 :-** मंडळाच्या 64 व्या सभेसमोर ठेवण्यांत आलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या सद्यस्थितीचा अहवाल.

एकूण 9 पाणीपुरवठा योजना "इतर कारणांसाठी" बंद आहेत, असे जे म्हटले आहे ती कारणे पुढील बैठकीत सांगण्यात यावी असे ठरले.

"64% कामे उद्‌भव अपुरे आहेत म्हणून बंद आहेत." सचिव,ग्राम विकास यांनी "उन्हाळयामध्ये चाचणी घेतल्याशिवाय उद्‌भव मान्य करू नये तसेच कुणाचाही आग्रह वा दबाव आलातरी हे तत्व पाळावे, तसेच तांत्रिक कामे पूर्ण केलीच पाहिजेत व असे केल्यास उद्‌भव अपुरे पडणार नाहीत," असे प्रतिपादन केले. त्यांनी असेही नमूद केले की, ब-याच वेळेला राजकीय दबाव किंवा 20 कलमी कार्यक्रमाचे फलीत दाखविण्याचे दृष्टीने योजना अतिशय तातडीने कार्यान्वीत केल्या जातात आणि उद्‌भवाबाबत योग्यती काळजी घेतली जात नाही म्हणून योजना बंद पडतात. अध्यक्षांनी याबाबत अशा सूचना केल्या की ग्रामीण भागातील यशस्वी न होणा-या योजना बद्दल तेथील कनिष्ठ अभियंता किंवा उप अभियंत्यांवर जबाबदारी ठरविण्यात यावी. आणि ती जर योजना बंद पडलीतर त्यांचे विरूध्द कार्यवाही करण्यात यावी. बैठकीत असे सांगण्यात आले की, याला फक्त मंडळाचे अधिकारीच जबाबदार नसून उद्‌भवाच्या खात्रीलायक बाबतचे प्रमाणपत्र देणारे जी.एस.डी.ए. चे अधिकारी सुध्दा तेवढयाच प्रमाणात जबाबदार असतात. श्री.अग्रवाल यांनी अशी सूचना केली की, फक्त गोपनीय अभिलेखाव्दारे जबाबदारीची पडताळणी होत नाही, म्हणून कामासाठी एक प्रोफार्मा ठेवण्यात यावा आणि उद्‌भवाची क्षमता नमूद करण्यात यावी, अध्यक्षांनी यावर "ठेकेदाराची रक्कम काही वेळ अडकवून ठेवावी" अशा सूचना दिल्या असता, सदस्य सचिवांनी असे स्पष्ट केले की, याबाबत आता करारपत्रामध्ये तरतूद करण्यात येते. उद्‌भवासंबंधी कुणी चुकीचा दबाव आणण्यात आल्यास ते अध्यक्षांच्या नजरेस आणण्यात येईल.

बंद पाणी पुरवठा योजनांबाबत "जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी या कामात लक्ष घालावे" असे परिपत्रक यापूर्वीच काढण्यात आले आहे. जिल्हापरिषदेला हस्तांतरीत झालेल्या योजनांचे देखभालीसाठी निधी ग्राम विकास खात्याकडून उपलब्ध करण्यांत येतो. पाणीपुरवठा मंडळाने त्या निधीचा हिस्सा मंडळास मिळावा म्हणून मागणी केली आहे, तो देण्याचे ग्राम विकास खात्यास मंजूर आहे असे सचिवांनी सांगितले.

**बाब क्र.5 :-** पूर्ण झालेल्या ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनांच्या हस्तांतरणाबाबत.

पुर्ण झालेल्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे हस्तांतरणाबद्दल बोलताना सदस्य सचिवांनी अशी विनंती केली की, ग्राम विकास विभागाने याबाबत, त्या योजनेवर कार्यान्वयीत मंडळाच्या कर्मचा-यांपैकी किती लोक जिल्हापरिषदेने योजना ताब्यात घेताना हस्तांतरीत करून घ्यावे हया बाबतीत जिल्हा परिषदेला दिलेल्या हक्काबद्दल फेरविचार करून बसाक समितीचे शिफारशीनुसार कार्यवाही करण्याचे ठरवावे. हा प्रश्न मंत्री मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करावा. सचिव,ग्राम विकास यांनी या बाबत विभागीय स्तरावर बैठका घेऊन पाणीपुरवठा योजनांचे देखभाल दुरूस्तीसाठी किती कर्मचारी लागतील याचा आढावा घेण्यात यावा असे सुचविले व जिल्हापरिषद वा ग्रामपंचायतीकडून नव्याने कोणतेही कर्मचारी या हस्तांतरीत योजनेवर लावले जाणार नाहीत याची हमी दिली.

**बाब क्र.8** :-म.पा.पु.व ज.नि.मंडळाच्या ठोक किरकोळ स्वरूपात पाणीपुरवठा करण्याबाबतच्या उप विधीमध्ये दुरूस्ती, अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करणेबाबत.

याबाबत अगोदरच निर्णय झालेला आहे व त्याप्रमाणे परिपत्रक लवकरच निर्गमित करण्यात येत आहे. तसेच उल्हासनगर पाणीपुरवठा ही नगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यामुळे हया प्रश्नाची तेवढीसी गांभीर्यता आता राहिलेली नाही.

**कार्यक्रम बाब क्र.3** : म.पा.पु.व ज.नि.मंडळाचे सन 1993-94 चे वार्षिक लेखे..

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी वार्षिक लेखे 93-94 यातील महत्वाच्या बाबी बैठकीसमोर मांडल्या. यावर चर्चा होऊन लेख्यांना मंजुरी देण्यात आली व खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव** :

RESOLUTION.

1. Resolved that the Annual Accounts for the year 1993-94 be adopted.

2. It is further resolved that the Annual Accounts for the year 1993-94 be authenticated by the Chairman and the Member Secretary on behalf of the Board.

3. Further, resolved that the minor corrections in the adopted accounts which do not materially alter the working result brought out in the accounts may be carried out under the signature of the Financial Adviser and Chief Accounts Officer and the Member Secretary.

4. Resolved that,

   i) A sum of Rs.825.57 lakhs be appropriated towards Depreciation Fund Reserve.

   ii) A sum of Rs.182.31 lakhs may be appropriated towards Sinking Fund.

**कार्यक्रम बाब क्र.4 :** सन 1994.95 मध्ये मंडळाची रोकड बद्दलची स्थिती....

सदस्य सचिवांनी असे स्पष्ट केले की, हया बाबीत म्हटल्याप्रमाणे मंडळाची पुढील 3 महिन्यांची गरज 110 कोटी रू. नसून 136 कोटी रू. आहे. त्यांनी असेहि प्रतिपादन केले की, शासकीय अनुदानापैकी 25% अनुदान मिळण्यास 9 महिने लागले आहेत, उरलेले 75% अनुदान पुढील 3 महिन्यांत देण्यात येईल अशी अपेक्षा आहे. अशा प्रकारे अनियमितरित्या मंडळाला अनुदान मिळत असल्यामुळे खर्चाचे नियोजन करता येत नाही.

सचिव,ग्राम विकास यांनी असे स्पष्ट केले की, ए.आर.पी. व एम.एन.पी. या कार्यक्रमांसाठी भरपूर पैसा उपलब्ध आहे आणि तो मंडळाला मिळण्याच्या पध्दतीत वेग आणावा. जागतिक बँकेचे कामासाठीसुध्दा 12 कोटी रू.ऐवजी 5 कोटी रू.शासनाने दिले असलेतरी ते 5 कोटी रू.खर्च केल्याचा तपशिल त्वरित सादर केल्यास उर्वरित रक्कम त्वरित उपलब्ध होऊ शकेल. झालेल्या खर्चाचे आकडे ताबडतोब मिळवून, शासनाला सादर करण्यासाठी एक यंत्रणा कार्यान्वीत करावी म्हणजे त्या आधारावर पुढील अनुदान देणे शासनाला शक्य होईल. सदस्य सचिवांनी, पुढील 3 महिन्यांत 136 कोटी रू.खर्च कसा करावा लागणार आहे ते स्पष्ट केले. मा.अध्यक्षांनी उप सचिव, वित्त विभाग यांना असे सांगितले की, नुकत्याच झालेल्या वित्त व नियोजन मंत्र्यांच्या बैठकीमध्ये 50 कोटी रू.अतिरिक्त अनुदान मंडळाला उपलब्ध करून द्यावे अशा प्रकारचा निर्णय झालेला असून त्याचा पाठपुरावा करावा.चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, 1994.95 वर्षी मंडळाला शासनाकडून देय असलेली उर्वरित रक्कम, रू.136.71 कोटी रू., 3 समान हप्त्यात यापूढे मार्च 31,1995 पर्यंत शासनाने मंडळाला द्यावी अशी विनंती शासनास करण्यात यावी.

असाही ठराव करण्यात येतो की, सार्वजनिक हित लक्षात घेऊन जनतेला योग्यप्रकारे व लवकरात लवकर व चांगल्यारितीने पाणीपुरवठा व्हावा म्हणून, मंडळाला किमान रू.50 कोटी अतिरिक्त अनुदान म्हणून द्यावेत म्हणजे सर्व योजनांची अंमलबजावणी वेळेवर करता येईल, अशी विनंती शासनास करण्यात यावी.

वरीलप्रमाणे शासनाकडे संपर्क साधण्यासाठी या ठरावाव्दारे मंडळाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.5 :** जागतिक बँक अर्थ सहाय्यीत महाराष्ट्र पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्प टप्पा-1 मधील पॅकेज 3 च्या मधील स्लाइस क्र.21 (जि.बीड) च्या निविदाच्या स्विकृतीस मान्यता.

जागतिक बँकेच्या अटी व शर्तीमुळे कमीत कमी निविदा ही मंजूर किंमतीपेक्षा ~~खर्च~~ वाढते हे मुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले व त्यावर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :**

1. महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्पांतर्गत गट-3 मधील निविदा क्र.21 (जि.बीड) च्या स्विकारार्थ, तसेच योजनेच्या अंदाजित किंमतीच्या खर्चापेक्षा होणा-या जास्त खर्चास मान्यता मिळविण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मंडळ कार्योत्तर मंजूरी देत आहे.
2. शासन व जागतिक बँकेची वरील निविदांच्या खर्चास अंतिम मान्यता मिळाल्यावर प्रस्तुत निविदा स्विकारण्यास मंडळाची मान्यता आहे. या संदर्भात पुढील आवश्यक कार्यपूर्तीसाठी मंडळाच्या

सदस्य सचिवांना प्राधीकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.6** : लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील भूकंपग्रस्त गावासाठी कायमस्वरूपी नळ योजनांच्या निविदा....

भुकंपग्रस्त गावास कशा प्रकारे सहाय्यक देण्यात आले याची माहिती दिल्यानंतर ही कार्यक्रम बाब मंजूर करण्यात आली.

कार्यवाही:
मुख्य अभियंता (प्रकल्प)

**कार्यक्रम बाब क्र.7** : अकोला शहर पाणी पुरवठा योजना -
अस्तित्वात असलेली 525 मि.मि.व्यासाची 500 मिटर लांबीची हयुमस्टीलच्या दाबनलिकेच्या जागी 600 मि.मि.व्यासाची बीडाची दाबनलिका टाकण्याचा प्रस्ताव.

या बाबत मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी योजनेची माहिती बैठकीस पुरविली. सदस्य श्री.गोखले यांनी ही पाईप लाईन बदलल्यामुळे पाईप लाईनच्या बाकीच्या भागावर जो ताण पडेल त्यापासून त्याचे संरक्षण करावे, तसेच पाईप लाईन खराब का होते याची पहाणी करावी अशी सूचना केली. चर्चेअंती खालील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव** :

अकोला शहर पाणीपुरवठा योजनेची सध्या अस्तित्वात असलेली 525 मीमी व्यासाची हयूमस्टील पाईपलाईन (500 मी.लांबी) बदलून तेथे 600 मीमी व्यासाची बीडाची 500 मी.पाईप लाईन टाकण्याच्या रू.27.36 लाख इतक्या किंमतीचे काम मंडळाच्या घसारा निधीच्या रकमेतून हाती घेण्यास मंडळ मंजूरी देत आहे. घसारा निधीतून रक्कम काढण्याचे अधिकार सदस्य सचिवांना व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना देण्यात येत आहेत.

कार्यवाही:
मुख्य अभियंता (ग्रा)

**कार्यक्रम बाब क्र.8** : मंडळाच्या 65 व्या सभेसमोर ठेवण्यांत येणां-या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा सद्य:स्थिती अहवाल.

63 व्या बैठकीसमोर जसा आढावा ठेवण्यात आला त्याप्रमाणे संपूर्ण योजनांचा आढावा दरवर्षी घेण्यात यावा अशी सूचना सचिव,ग्राम विकास यांनी केली. सदस्य सचिवांनी असे सांगितले की, ब-याच योजना या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी अडलेल्या आहेत व कामे बंद आहेत. ब-याच योजनांवर केवळ 50,000 किंवा 1,00,000/- रू.खर्च केलातर त्या योजना त्वरित कार्यान्वीत होतील, परंतू सुधारित अंदाजपत्रके तयार झालेली नसल्यामुळे या योजना अडून पडल्या आहेत. या संदर्भात अंदाजपत्रकांचा पाठपुरावा त्वरित करण्याचे दृष्टीने मंडळातर्फे असे सांगण्यात आले आहे की, एका निवृत्त मुख्य अभियंत्याकडे या कामाची कंन्सल्टंसी देण्याचा प्रस्ताव याच बैठकीत पूढील कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आला आहे. नवीन योजना मात्र वेळापत्रकानुसार चालू आहेत.

कार्यवाही:
मुख्य अभियंता(ना/प्र)

सचिव,नगर विकास विभाग यांनी याबाबत अशा सूचना दिल्या की, अशा प्रकारे योजनांचा आढावा नागरी योजनांसंबंधीही घेण्यात यावा मात्र तो मंडळाच्या बैठकी आधी त्यांच्याकडून मान्य करून घ्यावा.

**कार्यक्रम बाब क्र.9** : महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाची वाहने सार्वजनिक निवडणुका, विविध धार्मिक उत्सवाचे वेळी बंदोबस्त, कायदा व सुव्यवस्था राखणे इ.साठी अधिग्रहित न करणे बाबत...

याबाबत चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव मान्य करण्यांत आला.

ठराव :

सदस्य सचिव यांनी शासनास अशी विनंती करावी की, मंडळाच्या अधिका-यांची सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे मंडळाच्या अखत्यारितील वाहने शासनाने निवडणुका, कायदा व सुव्यवस्था इ.साठी यापुढे अधिगृहित करू नयेत. तसेच आतापर्यंत अधिगृहित केलेल्या वाहनांचे बाबतीत खर्चाची परिपूर्ती करावी.

**कार्यक्रम बाब क्र.10** : श्री.त्रं.झा.कळसकर, विभागीय लेखापाल यांच्या मुलाच्या मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रियेवरील वैयक्तीक खर्चाच्या प्रतिपूर्ती बाबत...

याबाबत चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव मान्य करण्यांत आला.

ठराव :

ठराव करण्यांत येतो की, वरील कार्यक्रम बाबीतील दिलेली परिस्थिती लक्षात घेता, मंडळातील श्री.त्रं.झा.कळसकर, विभागीय लेखापाल अमरावती यांनी त्यांचा मुलगा श्री.रविंद्र कळसकर यांच्या मुत्रपिंड रोपन शस्त्रक्रियेसाठी आलेला पण सर्वसाधारणपणे प्रतिपूर्ती देय्य नसलेल्या रू.34,069/- च्या खर्चाच्या प्रतिपूर्तीस महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीचे नियम शिथिल करून हे मंडळ मान्यता देत आहे.

पुढील विषय या सभेत न घेता (निवडणूक आचारसंहितेच्या पालनासाठी) पूढील बैठकीत ठेवावे असे मा.अध्यक्षांनी निर्देशीत केले.

**कार्यक्रम बाब क्र.11** : रूपांतरित अस्थायी/स्थायी आस्थापनेवरील विहित माध्यमाव्दारे नियुक्त न झालेल्या कर्मचा-यांना विशेषतः कारकुन या श्रेणीतील कर्मचा-यांना नियमित अस्थायी आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक, अनुरेखक, सहा.भांडारपाल,टंकलेखक इ.पदावर नेमणूक देण्या संबंधी.

**कार्यक्रम बाब क्र.12** : **अमोनिया प्रिंट अलाऊंस.**
**कार्यक्रम बाब क्र.13** : वहान भत्ता.
**कार्यक्रम बाब क्र.15** : पदवी/पदविकाधारक कर्मचा-यांना एक आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत.
**टेबल कार्यक्रम बाब क्र.2**:-मंडळातील अभियंत्यांना आपल्या खात्याव्यतिरिक्त इतर खात्याची तांत्रिक छाननीची तसेच तांत्रिक मंजूरी देण्याची कामे केल्याबाबत अतिरिक्त भत्ता मंजुर करण्याबाबत.

**कार्यक्रम बाब क्र.14** : ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सुधारित अंदाजपत्रके तयार करणे करिता तांत्रिक सल्लागार नेमणे बाबत.

...8.

सुधारित अंदाजपत्रके तयार करण्यावर यापूर्वीच सविस्तर चर्चा झालेली असल्याने खालील ठराव मान्य करण्यांत आला आहे.

**ठराव :**

मंडळातील 380 ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची सुधारित अंदाजपत्रके तयार करण्याचे काम तातडीने करणेसाठी कार्यक्रम बाबीमधील अटीच्या अधीन राहून श्री.आ.आ.संकपाळ, सेवानिवृत्त मुख्य अभियंता यांना रू.50,000/- मानधनावर 6 महिन्यांसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून नेमण्यास मान्यता देणेत येत आहे. मंडळाचे सदस्य सचिव यांनी हयाबाबत पुढील कार्यवाही करावी. मात्र केलेल्या कामानुसार मोबदला त्यांना प्रदान करण्यात यावा.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.1 :** नेहरू रोजगार योजना - गृहनिर्माण व गृहसुधार कार्यक्रम अंतर्गत बीड जि.बीड या नगरपालिकेसाठी हुडको मुंबई यांचेकडून कर्ज उभारणीबाबत.

सचिव,ग्राम विकास विभाग यांनी असा मुद्दा मांडला की, घरबांधणी, गृहसुधार हे मंडळाचे काम नाही. ते मंडळावर सोपविणे बरोबर नाही. तेंव्हा हे काम म्हाडा कडे देण्यात यावे याचा विचार करण्यांत यावा व खालील ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :**

बीड नगरपालिकेसाठी नेहरू रोजगार योजना घरबांधणी व गृहसुधार कार्यक्रमांतर्गत रू.3,82,50,000/- हुडको कर्ज (कर्जाच्या अटी/शर्तीसह) स्विकारण्यास मंडळ संमती देत आहे. आणि सदस्य सचिव/वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना कर्जासाठी हुडकोकडे व शासन हमीसाठी शासनाकडे संपर्क साधण्याबाबत अधिकार देण्यात येत आहेत.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.3 :** महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या सदस्य सचिवांसाठी मुंबई येथे भाडयाने निवासस्थान देणे...

सदस्य सचिवांना मंत्रालयाच्या आसपास जागा असणे आवश्यक आहे हे शासनाने तत्वतः मान्य केले आहे. याबाबत सदस्य सचिवांनी निवासस्थान मिळविण्यासाठी गेल्या 9 महिन्यांत केलेल्या खडतर प्रयत्नांची माहिती दिली व त्यातून काहीच निष्पन्न न झाल्यामुळे ही बाब सादर करण्यांत आली आहे असे नमूद केले. यावर मा.अध्यक्षांनी सचिव,नगर विकास/ग्राम विकास हयांना विनंती केली की, त्यांनी सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे हयासाठी स्वतः संयुक्त प्रयत्न करावे. मंडळाचे सदस्य श्री.अग्रवाल यांनी सुचविले की, मंत्रालयाच्या आसपास 2/3 फ्लॅट मंडळाने विकत घ्यावे म्हणजे त्याचा उपयोग मंडळाचे उच्चपदस्थ अधिकारी तसेच मंडळाचे सदस्यांसाठी करता येईल. ही सूचना अध्यक्षांनी मान्य केली. तसेच म्हाडा कडून असे 2/3 फ्लॅट विकत मिळू शकतील का याचाही तपास करण्याच्या सूचना अध्यक्षांनी केल्या. यातून 1 महिन्याचे आत जर काहीच फलनिष्पत्ती झाली नाहीतर या बाबमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सदस्य सचिवांसाठी निवासस्थान भाडयाने घेण्यास मान्यता देण्यात आली.

अध्यक्षांचे आभार मानून सभा समाप्त झाली.